# *अनुक्रमणिका*

**शैक्षणिक वेळापत्रक** ........ ३

१. विद्याशाखेचा परिचय ........ ५

२. एम.ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रमाविषयी (M 12) ........ ५

  २.१ उद्दिष्टे

  २.२ शिक्षणक्रमाची संरचना

३. प्रवेश प्रक्रिया ........ ६

  ३.१ प्रवेश पात्रता

  ३.२ प्रवेश अपात्रता

  ३.३ एकूण जागा

  ३.४ आरक्षणाबाबत

  ३.५ प्रवेशासाठी अंतिम गुणनिश्चिती

  ३.६ निवड प्रक्रिया

  ३.७ शिक्षणक्रम शुल्क

  ३.८ कालावधी

  ३.९ माध्यम

४. नोंदणी प्रक्रिया ........ ८

५. मूल्यमापन प्रक्रिया ........ १०

६. विभागीय केंद्रे ........ १२

७. अभ्यास केंद्रे ........ १३

८. परिशिष्टे ........ १६

## निर्मिती

श्री. आनंद यादव

व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२


© २०१४ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक


■ **प्रथम प्रकाशन** : जुलै २०१४

■ **अक्षरजुळणी** : वैभव डीटीपी सेंटर, नाशिक

■ **प्रकाशक** : डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

**NB-14-15-35/Vaibhav**

# शिक्षणशास्त्र विद्याशाखा : एम.ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रम

## शैक्षणिक वेळापत्रक : २०१४–२०१६

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | प्रवेश | : | ०१ जुलै ते ३१ जुलै २०१४ |
| ०२. | उद्‌बोधन/प्रथम संपर्कसत्र (प्रथम वर्ष) | : | ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१४ |
| ०३. | द्वितीय संपर्कसत्र (प्रथम वर्ष) | : | एप्रिल/मे २०१५ |
| ०४. | अंतिम परीक्षा (सैद्धांतिक) प्रथम वर्ष | : | मे/जून २०१५ |
| ०५. | प्रथम संपर्कसत्र (द्वितीय वर्ष) | : | ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१५ |
| ०६. | द्वितीय संपर्कसत्र (द्वितीय वर्ष) | : | मे/जून २०१६ |
| ०७. | संशोधन अहवाल अभ्यासकेंद्रावर सादरीकरण | : | एप्रिल/सप्टेंबर २०१६ |
| ०८. | अभ्यासकेंद्रावर मौखिक परीक्षा आयोजन | : | एप्रिल/सप्टेंबर २०१६ |
| ०९. | संशोधन अहवाल परिशीलन (विद्यापीठात) | : | मे/ऑक्टोबर २०१६ |
| १०. | अंतिम परीक्षा (द्वितीय वर्ष) | : | मे/जून २०१६ |
| ११. | निकाल | : | जुलै २०१६ |

**अति महत्त्वाच्या विशेष सूचना** :

(१) अपरिहार्य कारणाने वरील वेळापत्रकात बदल झाल्यास अभ्यासकेंद्रांना कळविण्यात येईल.

(२) परीक्षा–अर्ज, संपर्कसत्र, परीक्षा, पुस्तकांबाबत अभ्यासकेंद्राशी संपर्क साधावा.

(३) एम.ए. (शिक्षणशास्त्र) च्या 'मे' मध्ये प्रथम वर्षाची परीक्षा दिल्यानंतर पुनर्परीक्षार्थींना पुन्हा ऑक्टोबर/नोव्हेंबरमध्ये परीक्षा देता येईल. तसेच दोन वर्षांतून तीन वेळा परीक्षेला बसता येईल.

(४) मुख्यालय/विभागीय केंद्रावर प्रवेश–अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, तसेच पोस्टाने/कुरिअरने अर्ज पाठवू नयेत असे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

(५) अभ्यासकेंद्रावर प्रवेश शुल्काचे रोख पैसे देऊ नये.

(६) ही माहितीपुस्तिका अत्यंत महत्त्वाची आहे. अध्ययनार्थीने प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचावी. विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून http://ycmou.digitaluniversity.ac येथून Download करून शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत सांभाळून ठेवावी.

(७) विद्यार्थ्याने एकदा प्रवेश घेऊन अर्ज भरल्यानंतर अपात्र झाल्यास तसेच कोणत्याही परिस्थितीत शुल्क परत मिळणार नाही.

(८) संपूर्ण प्रवेश अर्ज विद्यार्थ्याने अर्ज अभ्यासकेंद्रावर देण्यापूर्वी स्वत:जवळ झेरॉक्सप्रत जपून ठेवावा व मूळ अर्ज दिल्यानंतर अभ्यासकेंद्राकडून पोच घ्यावी.

**वेबसाईट : http://ycmou.digitaluniversity.ac** <u>**or**</u> **www.ycmou.ac.in**

(९) विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्राच्या सतत संपर्कात राहावे, विद्यार्थ्यांच्या अडचणी अभ्यासकेंद्रावरच सोडविल्या जातील.

(१०) विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्ज अभ्यासकेंद्राकडून विभागीय केंद्र/मुख्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यांनी प्रवेश अर्जात नमूद केलेल्या विषयानुसार अभ्यासकेंद्रामार्फत पुस्तके वितरित होतील. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्राच्या संपर्कात राहावे.

(११) अध्ययनार्थींना एका वेळी केवळ दोनच शिक्षणक्रमास (एक पदविका व पदवी प्रमाणपत्र) प्रवेश घेता येईल.

(१२) एकदा अध्ययनार्थीने प्रवेश घेतल्यानंतर कुठल्याही परिस्थितीत अभ्यासकेंद्र व विषय बदलून मिळणार नाही.

(१३) विद्यार्थ्याच्या नाव बदलाबाबत ज्या नावाने प्रवेश घेतलेला असेल त्याच नावाने प्रमाणपत्र मिळेल. जर नावात बदल करावयाचा असेल तर सोबत राजपत्र जोडण्यात यावे, मात्र प्रथम प्रवेश घेतानाच नाव बदलण्याची प्रक्रिया राजपत्रातील आदेशान्वये केली जाईल.

(१४) प्रवेश प्रक्रिया १ जुलै २०१४ ते ३१ जुलै २०१४ पर्यंत होईल. त्यानंतर प्रवेश घेतल्यास खालीलप्रमाणे विलंब शुल्क आकारले जाईल.

(१५) (१) १ ऑगस्ट ते १६ ऑगस्ट २०१४ पर्यंत २०० रु. विलंब शुल्क आकारण्यात येईल.

(२) १७ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०१४ पर्यंत ५०० रु. विलंब शुल्क आकारण्यात येईल.

(१६) एम.ए. (शिक्षणशास्त्र) चा २०१४-१६ तुकडीचा प्रवेश हा प्रथम वर्ष व द्वितीय वर्षासाठी एकदाच घेण्यात येईल.

(१७) द्वितीय वर्षाच्या नोंदणीविषयी अभ्यासकेंद्राच्या संपर्कात राहावे व प्रथम वर्षाच्या शेवटीच निदर्शनास आणून द्यावे.

---

**टीप :** विद्यापीठाने वेळोवेळी घेतलेले निर्णय अभ्यासकेंद्र व विद्यार्थ्यांकरिता बंधनकारक राहील.

## १. विद्याशाखेचा परिचय

या विद्यापीठात एकूण आठ विद्याशाखा आहेत. विद्यापीठाच्या स्थापनेनंतर अवघ्या एक वर्षात शिक्षणशास्त्र विद्याशाखेची स्थापना झाली. त्यानंतर शिक्षणशास्त्र विद्याशाखेने आपले नाव संपूर्ण महाराष्ट्रात उज्ज्वल करण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली. आज संपूर्ण महाराष्ट्र शिक्षणशास्त्र विद्याशाखेकडे नेतृत्वाच्या दृष्टीने पाहतो. अद्ययावतता, गतिमानता आणि नवोपक्रमांचे स्वागत ही या विद्याशाखेची वैशिष्ट्ये.

शिक्षणशास्त्र विद्याशाखेने आपल्या कार्यास सुनिश्चितरित्या आणि गुणवत्ता राहावी या दृष्टीने विद्याशाखेचे गुणवत्ता धोरण, व्रतविधान आणि उद्दिष्टे निश्चित केली. त्या अनुषंगाने विद्याशाखेत प्रमाणपत्रापासून संशोधनापर्यंत अनेक शिक्षणक्रम टप्प्या-टप्प्याने सुरू झाले. विद्याशाखेच्या स्थापनेनंतर अवघ्या एक वर्षात (१९९१) दूरशिक्षणाद्वारे बी. एड. शिक्षणक्रम सुरू करणारे संपूर्ण भारतातील हे पहिले मुक्त विद्यापीठ होय. त्यानंतर ह्या विद्याशाखेने अवघ्या दहा-पंधरा वर्षांत एम. फिल. शिक्षणशास्त्र (२००७), एम. फिल. शारीरिक शिक्षण (२००७), एम. एड. (१९९४), एम. ए. शिक्षणशास्त्र (२००७) असे उच्च पदवी शिक्षणक्रम सुरू केले. एवढेच नव्हे तर विद्यापीठाच्या ध्येयास सुसंगत असे तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवणारे स्वयं-साहाय्य गट बांधणी (२००२), बालसेविका (२००२), ई. बी. एड. (२००९), यांसारखे प्रमाणपत्र शिक्षणक्रमही कार्यान्वित केले. शिक्षणाची गुणवत्ता वाढावी यासाठी मुख्याध्यापकांसाठी शालेय व्यवस्थापन पदविका तर माध्यमिक शिक्षकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षणांचे आयोजन केले. 'ज्ञानगंगा घरोघरी' पोहचवण्याच्या दृष्टीने संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात अभ्यासकेंद्रे स्थापन केली.

मुक्त विद्यापीठाची शिक्षणपद्धती दूरशिक्षणाची असते, तर ह्या विद्याशाखेत प्रवेश घेणारे विद्यार्थी सेवांतर्गत असतात. ह्याचा विचार करून शिक्षणक्रमांची व त्यातील प्रात्यक्षिकांची रचना केली. प्रत्येक प्राप्त अनुभव वास्तविक स्तरावर पडताळून पाहता यावा यासाठी विशेष प्रात्यक्षिकांचे नियोजन केले. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व तज्ज्ञांच्या मदतीने मुद्रित-अमुद्रित साहित्य तयार केले. ह्या विद्याशाखेतील शिक्षणक्रम व्यावसायिक असतात. त्याचा विचार करता अभ्यासकेंद्रांवर शिक्षणक्रमातील विशिष्ट प्रात्यक्षिके मार्गदर्शनाखालीच करता यावी, त्याचा सराव व्हावा या दृष्टीने संपर्कसत्रांचे आयोजन केले.

मुक्त विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विद्याशाखा अनेकविध पुरस्कारांनी विभूषित आहे हे सांगण्यास आम्हाला आनंद होतो. आंतरराष्ट्रीय पुरस्कारात डॉ. अनंत जोशी, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना COL कडून मिळालेला जीवनगौरव पुरस्कार, श्रीमती वानखेडे स्वाती, बी. एड., एम. एड. ची विद्यार्थिनी ह्यांना COL कडून मिळालेला Award of Excellence for D.E. ह्यांचा समावेश होतो. तसेच येथील प्राध्यापक वर्गासही राष्ट्रीय व राज्य पातळीवरील वैयक्तिक पुरस्कार मिळालेले आहेत.

## २. एम. ए. (शिक्षणशास्त्र) (M12) शिक्षणक्रमाविषयी

शिक्षणशास्त्र हे सामाजिकशास्त्र आहे. या शास्त्रातही पदव्युत्तर पदवी एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रम असावा म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाने सन २००१ साली त्याचा अभ्यासक्रम आकृतिबंध (Curriculum) प्रसिद्ध केला व त्यात एम.ए. शिक्षणशास्त्र यास पदव्युत्तर पदवीचा विषय म्हणून मान्यता दिलेली आहे.

एम.ए. शिक्षणशास्त्र निष्णात शिक्षणक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिक्षणातील विविध घटकांचा अभ्यास करावा असे अपेक्षित आहे. विविध पातळींवरील सेवांतर्गत प्रशिक्षण, धोरण विकसन, चिकित्सा, शिक्षण प्रणालीचे मूल्यमापन यासाठी निष्णात व्यक्तींची आवश्यकता आहे. काळानुरुप शिक्षण प्रक्रियेत होत गेलेले बदल अभ्यासणे गरजेचे आहे. शिक्षणशास्त्र ही विद्याशाखा आंतरज्ञानशाखीय (Multi-disciplinary) आहे. त्यामुळे तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास, व्यवस्थापनशास्त्र अशा अनेकविध विद्याशाखांमधून विविध तत्त्व, प्रणाली शिक्षणास मिळालेल्या आहे. या सर्वांचा अभ्यास एम.ए. शिक्षणशास्त्र निष्णात व्यक्तींनी करणे गरजेचे आहे.

शिवाजी विद्यापीठात पदवी पातळीवर बी.ए. शिक्षणशास्त्र राबविण्यात येत आहे. तर ओरिसा, आसाम आणि मुंबई विद्यापीठानेही एम.ए. शिक्षणशास्त्र हा शिक्षणक्रम सुरू केलेला आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने सुचविलेल्या एम.ए. शिक्षणशास्त्र ह्या पदवीची दखल नॅशनल कौन्सिल फॉर टीचर एज्युकेशन (एन.सी.टी.ई.) या संस्थेनेही घेतलेली असून डी.एड./बी.एड. महाविद्यालयात शिकविण्यासाठी एम.एड./एम.ए.शिक्षणशास्त्रास मान्यता दिलेली आहे. (नियम क्र. २९/११/१९९५, (Annex-A) संपूर्ण महाराष्ट्रातील विविध स्तरांवरील कार्यरत शिक्षकांना दैनंदिन कार्याशी निगडित पदव्युत्तर पदवी घेण्याच्या दृष्टीने मुक्त विद्यापीठाने उचललेले हे एक नवे पाऊल आहे.

### २.१ उद्दिष्टे

- पाश्चात्त्य आणि भारतीय तत्त्वज्ञानाचा शिक्षणक्षेत्रातील सहभाग स्पष्ट करणे.
- सामाजिक बदलाचा शिक्षणातील सहभागावर झालेला परिणाम स्पष्ट करणे.
- मानसशास्त्रातील विविध शाखांमधून शिक्षणशास्त्र कसे विकसित झाले ह्याचे आकलन वृद्धिंगत करणे.
- शैक्षणिक मानसशास्त्र, शिक्षणाचे तत्त्वज्ञान, शिक्षणाचे समाजशास्त्र, मूल्यमापन, इत्यादी क्षेत्रांतील ज्ञानपातळी उंचावण्यास मदत करणे.
- शैक्षणिक संशोधनासाठी आवश्यक ते ज्ञान, दृष्टी, कौशल्ये विकसित करणे.
- शैक्षणिक नियोजन, प्रशासन, निरंतर व अनौपचारिक शिक्षण, शैक्षणिक तंत्रविज्ञान, प्रौढ शिक्षण या क्षेत्रांसाठी आवश्यक ते मनुष्यबळ निर्माण करणे.

## २.२ शिक्षणक्रमाची संरचना

(अ) अभ्यास विषय : ८ सैद्धान्तिक विषय ६४ श्रेयांक
(आ) संशोधन : ०६ श्रेयांक
(इ) एकूण श्रेयांक : ७०
(ई) किमान कालावधी : २४ महिने
(उ) एकूण अध्ययन तास : २५०० घड्याळी तास (अंदाजे)

ह्या शिक्षणक्रमाचा कालावधी २ वर्षांचा असला तरी विद्यार्थी त्याच्या सोईप्रमाणे प्रवेश घेतल्यापासून ५ वर्षांत हा शिक्षणक्रम पूर्ण करू शकेल. ह्या कालावधीत शिक्षणक्रम पूर्ण न करणाऱ्या विद्यार्थ्यास शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी पुन्हा पाच वर्षांसाठी ज्या वर्षी नोंदणी कालावधी संपतो त्या वर्षाच्या तुकडीचे संपूर्ण शुल्क भरून पुनर्नोंदणी करण्याची संधी देण्यात येते.

# ३. प्रवेश–प्रक्रिया

## ३.१ प्रवेश–पात्रता

(१) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची **शिक्षणशास्त्र** विषयातील बी.ए. पदवी उत्तीर्ण (खुल्यासाठी ५५%) व (मागासवर्गासाठी ५०%)

***किंवा***

यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या पदवीच्या किमान द्वितीय वर्षापर्यंत शिक्षणशास्त्र विषय घेतलेले (खुल्यासाठी ५५%) व (मागासवर्गासाठी ५०%)

***किंवा***

(२) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची शिक्षणशास्त्र पदवी (बी.एड.) उत्तीर्ण झालेले उमेदवार (खुल्यासाठी ५५%) व (मागासवर्गासाठी ५०%)

***किंवा***

(३) बी.ए. बी.एड. (एकात्मिक) उत्तीर्ण किंवा बी.एस्सी. बी.एड. (एकात्मिक) उत्तीर्ण

- प्रवेश गुणवत्तेनुसार देण्यात येईल.

खालील प्रकारच्या गुणवत्तेचा प्रवेशासाठी विचार केला जाणार नाही.

## ३.२ प्रवेश–अपात्रता

(१) बी.पी.एड. पदवी/बी.एड. (फिजिकल) धारक असलेले.
(२) डी.एड. पदवीधारक.

## ३.३ एकूण जागा

प्रत्येक अभ्यासकेंद्रावर २५ जागा आहेत.

## ३.४ आरक्षणाबाबत

शासन नियमानुसार व विद्यापीठ ठरावानुसार पुढीलप्रमाणे आरक्षित जागा राहतील.

(०१) **अपंग** : महाराष्ट्र शासनाच्या नियमाप्रमाणे राज्यातील शासनमान्य शाळां–तील अस्थिव्यंग, अल्प दृष्टी, कर्णबधिर असलेल्या उमेदवारांसाठी शासकीय नियमांनुसार ३% जागा राखून ठेवल्या जातील. राज्यातील अभ्यासकेंद्रावरील प्रवेश परिस्थिती आणि गुणवत्ता यादी यांचा विचार करून या जागा भरण्यात येतील. (अपंगाबाबतची सविस्तर योजना परिशिष्टात दिलेली आहे.)

(०२) **सैनिक** : सैन्यदलातील सक्रिय सेवेत असलेल्या आजी व माजी कर्मचारी किंवा त्यांचा मुलगा/मुलगी यांना २% जागा राखून ठेवल्या जातील.

(०३) स्वातंत्र्यसैनिक पती/पत्नी, मुलगा/मुलगी, भूकंप व प्रकल्पग्रस्त, विधवा व परितक्त्या यांपैकी एकाच संवर्गासाठी २ गुण अतिरिक्त देण्यात येतील.

(०४) आरक्षणाच्या जागांवर पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास रिक्त जागा सदरच्या प्रवर्गानुसार मुक्त समजण्यात येतील. त्या मूळ प्रवर्गास दिल्या जातील.

(०५) आरक्षित जागांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराने किमान पात्रतेची अट पूर्ण करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासनाच्या निर्णय क्रमांक एसटीसी १०९९/बी.एड. प्रवेश/(१४/९९)/मशि–३ दि. १९ जानेवारी ९९ अन्वये अनुक्रमे अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती / विमुक्त जाती व भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय यांच्यासाठी ५०% जागा राखून ठेवलेल्या आहेत. ह्या जागा शासनाच्या उपर्युक्त निर्णयानुसार भरण्यात येतील. एकूण निर्धारित जागांमध्ये आरक्षण पुढीलप्रमाणे राहील.

**आरक्षित जागा दर्शविणारा तक्ता**

| *अ. क्र.* | *प्रवर्ग* | *प्रमाण/ टक्के* |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती (अनुसूचित जातीमधील बौद्ध धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती) (एस.सी.) | १३% |
| २. | अनुसूचित जमाती (एस.टी.) | ७% |
| ३. | विमुक्त जाती (मूळ १४ व तत्सम जाती) 'अ' (व्ही.जे.) | ३% |
| ४. | भटक्या जमाती (जाने. १९९७ पूर्वीच्या २८ व तत्सम जाती, नव्याने समाविष्ट (एन.टी. 'ब') केलेल्या तत्सम जाती) 'ब' (७ मे २००५ जी.आर.) | २.५% |
| ५. | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) 'क' (एनटी. 'क') | ३.५% |
| ६. | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) 'ड' (एनटी. 'ड') | २% |
| ७. | इतर मागासवर्गीयांकरिता (ओ.बी.सी.) | १९% |
| | **एकूण** | **५०%** |

(०६) **विशेष मागास प्रवर्गाबाबतची तरतूद**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासननिर्णय क्र.टीईएम/३३९७/१२९२६/(९०८६)/तांशि–१/दि. ११ जुलै ९७ च्या शासननिर्णयानुसार आरक्षित जागा एकूण ५० टक्के करण्यात आल्या. या शासननिर्णयाच्या तरतुदीनुसार गुणवत्ता यादीनुसार प्रवेशप्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण प्रवेश–क्षमतेच्या जास्तीत जास्त

२ टक्क्यांपर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात येईल.

**शासन परिपत्रक क्र. सीबीसी १०/२००६/प्र.क्र.१५/मावक – ५, दिनांक ५ जून २००६ अन्वये विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागासवर्गीय उमेदवारांना नॉन क्रीमीलेअर प्रमाणपत्र योग्य त्या पद्धतीचा अवलंब करून देण्याबाबतचा उल्लेख आहे त्यानुसार कार्यवाही होईल.**

(०७) एकूण प्रवेश क्षमतेच्या ३०% जागा महिला उमेदवारांकरिता आरक्षित आहेत.

### अत्यंत महत्त्वाचे

(१) **अर्ज करते वेळी अनुसूचित जमातीतील उमेदवाराकडे जात दाखला असणे आवश्यक आहे. जर तुमच्याकडे जात वैधता व जातीचा दाखला नसेल तर अर्ज करू नये.** अर्ज स्वीकारताना ते पडताळून पाहण्यात येईल, आणि नंतरच अर्ज स्वीकारला जाईल. जर ते नसेल तर अर्ज स्वीकारला जाणार नाही.

**विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील उमेदवारांनी ज्या नावाने प्रवेश अर्ज भरलेला असेल त्या नावाचा वैध कालावधीतील सायस्तर नसल्याचा दाखला असणे अत्यावश्यक आहे.**

(२) एस.टी. (ST) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी जातवैधता व जातीचा दाखला असणे आवश्यक आहे.

(३) SC/ST/VJ-A/NT-B/NT-C/NT-D/OBC/SBC या प्रवर्गातील जागांवर पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास रिक्त जागा शासनाने निर्धारित केलेल्या निर्णयानुसार बदल करण्यात येतील.

(४) इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (**IGNOU**) मधून बी.एड. पदवी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना श्रेणी पद्धतीने गुणपत्रक दिलेले असतात. या श्रेणींचे अचूक गुणांक येण्यासाठी सांख्यिकी पद्धतीचा वापर करून गुणांक काढल्यानंतर ते प्रवेशअर्जात भरलेल्या गुणांपेक्षा कमी निदर्शनास येतात; अशा वेळी प्रवेश समितीने प्रवेश नाकारल्यास अर्जदाराला कुठेही तक्रार करता येणार नाही अथवा **इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाकडून श्रेणिपत्रकाऐवजी गुणपत्रक सादर करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.** विद्यापीठ अशा उमेदवारास कोणतीही माहिती देण्यास बांधील राहणार नाही.

(५) श्रेणी–अंकाचे गुणांत रूपांतर करण्यासाठी परिशिष्टामध्ये कोष्टक दिलेले आहे. त्यानुसारच आपण प्रवेश–अर्जात संबंधित शिक्षणक्रमास मिळालेल्या टक्केवारीची नोंद करावी.

**इतर विद्यापीठातही श्रेणीपद्धती असल्यास श्रेणीचे गुणात रूपांतर विद्यापीठाच्या लेटरहेडवर मिळविणे ही विद्यार्थ्याची जबाबदारी आहे.**

***टीप :*** *आरक्षणाच्या संदर्भात जर काही प्रश्न उपस्थित झाल्यास महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.*

## ३.५ प्रवेशासाठी अंतिम गुण निश्चिती

(१) **सदर शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी गुणवत्ता यादी तयार करताना बी.एड./बी.ए.बी.एड. (एकात्मिक)/दुसऱ्या वर्षापर्यंतच्या शिक्षणशास्त्र विषय घेतलेल्या पदवीचे गुण पायाभूत धरले जातील.**

(२) वरील परीक्षेतील गुणांची गणना करण्याकरिता पुढीलप्रमाणे बघणे आवश्यक आहे –

(अ) गुणपत्रकावर ५५% गुण नोंदवलेले आहे.

(आ) बी.एड.च्या गुणपत्रकावर तात्त्विक (Theory) व प्रात्यक्षिक (Practical) हे वेगवेगळे देण्यात आलेले असतील तरी एकत्रित गुणांचा विचार करण्यात येईल.

(इ) बी.एड. तात्त्विक आणि प्रात्यक्षिक एकत्रित गुण ५५% असतील असे उमेदवार पात्र ठरू शकतो.

(ई) गुणपत्रकावर श्रेणी (Grade) पद्धतीने निकाल दिलेल्या असल्यास संबंधित विद्यापीठाने श्रेणीचे गुण कसे धरले जातात यासंबंधीची अधिकृत माहिती पुरवली तरच संबंधित श्रेणी (Grade) चे गुणात रुपांतर करून अशा गुणांचा एकत्रित विचार करता येईल. त्यासाठी उमेदवारांनी श्रेणीचे रुपांतर कसे केले जाते या गुणांबाबतची संबंधित माहिती जोडणे आवश्यक आहे.

(३) बी.ए. (शिक्षणशास्त्र) या पदवीचे तिन्ही वर्षांतील एकत्रित गुण धरले जातील.

(४) पदवीच्या प्रथम आणि दुसऱ्या वर्षाला शिक्षणशास्त्र विषय घेतला असल्यास फक्त दोन वर्षांचे गुण धरण्यात येतील.

(५) पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्राप्त झालेल्या वर्गांना (Class) पुढीलप्रमाणे गुण धरण्यात येतील.

| | |
|---|---|
| (अ) प्रथम वर्ग | ५ गुण |
| (आ) द्वितीय वर्ग | ४ गुण |
| (इ) तृतीय वर्ग | ३ गुण |

परंतु पदव्युत्तर पदवी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची असेल त्यास अधिक '२' गुण धरण्यात येतील.

(६) एकापेक्षा अधिक पदव्युत्तर पदव्या असतील तर त्यांपैकी एकच पदव्युत्तर पदवी ग्राह्य धरण्यात येईल.

(७) बी.ए.,बी.एस्सी,बी.कॉम.,बी.एड. (एकात्मिक) असल्यास संपूर्ण पदवीचे गुण धरण्यात येतील.

(८) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या प्रमाणपत्रांना खालील–प्रमाणे गुण देण्यात येतील –

| | |
|---|---|
| (अ) प्रमाणपत्र शिक्षणक्रम | २ गुण |
| (आ) पदविका शिक्षणक्रम | ३ गुण |
| (इ) पदवी शिक्षणक्रम | ४ गुण |

परंतु तो शिक्षणक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र तुमच्याकडे असेल तर प्रत्येकाचे गुण अतिरिक्त देण्यात येतील. म्हणून हे शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांनाच या संधीचा फायदा घेण्यात येईल. जर तुम्ही हा शिक्षणक्रम करत असाल किंवा अपूर्ण असेल तर हे गुण मिळणार नाहीत.

(९) अंतिम गुणवत्ता यादीत जर समान गुण असतील तर प्रथम पदवीचे बी.एड./बी.ए. (शिक्षणशास्त्र)/प्रथम + द्वितीय वर्षापर्यंतच्या शिक्षणशास्त्र विषय घेतलेले गुण/बी.ए./बी.एस्सी./बी.कॉम. बी.एड. (एकात्मिक) गुण आणि नंतर वयानुसार ज्येष्ठता विचारात घेण्यात येईल. जर वय समान असेल तर ज्यांनी पदवी अगोदर प्राप्त केलेली असेल तर त्यांना प्राधान्य मिळेल. त्यानंतरही समान गुण असल्यास गुणवत्ता क्रम ठरविण्याचा अधिकार निवड समितीकडे राहील व तो निर्णय अंतिम राहील.

## ३.६ निवड प्रक्रिया

(०१) शासनाच्या निर्धारित आरक्षणाच्या नियमानुसार अशा उमेदवारांची यादी अभ्यासकेंद्रावर तयार करण्यात येईल.

(०२) प्रवेशासाठी गुणवत्तेनुसार किमान टक्के गुण (Cut off point) निर्धारित करून गुणवत्तेनुसार संपूर्ण जागा भरेपर्यंत प्रवेश दिले जातील.

(०३) उमेदवाराचे नाव प्रवेश यादीत असल्यास अभ्यासकेंद्रावर मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. पोस्टाद्वारे आपणास पत्रव्यवहार केला जाईल.

(०४) विद्यार्थ्याने प्रवेशासाठी समस्त अभ्यासकेंद्राशी संपर्कात राहावे.

(०५) उमेदवाराला आपल्या अभ्यासकेंद्रावर गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल.

(०६) उमेदवाराला एकापेक्षा अधिक किंवा जास्तीत जास्त ३ केंद्रांवर स्वतंत्रपणे प्रवेश–अर्ज भरता येईल.

(०७) एखाद्या अभ्यासकेंद्रावर विशिष्ट प्रवर्गातील विद्यार्थी–संख्या भरली गेली नसल्यास इतर नजिकच्या अभ्यासकेंद्रावर विद्यार्थी वर्ग करण्यात येतील. सदर हक्क विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

(०८) सामान्य (खुला) प्रवर्गाचे प्रवेश करण्यापूर्वी शारीरिक अपंग, कर्णबधिर, अल्पदृष्टी, सैनिक दलातील आजी–माजी कर्मचाऱ्यांचा मुलगा/मुलगी, बेळगाव – गोवा सीमा भागातील मराठी भाषिक उमेदवार, महिला आरक्षणाच्या जागा अंतर्गत आरक्षण असल्यामुळे प्रथम गुणवत्तेनुसार या जागा भरल्या जातील व भरलेल्या जागा ज्या संवर्ग व प्रवेश प्रवर्गाच्या असतील तेवढ्या जागा नियमित प्रवेशांच्या जागांमधून कमी करण्यात येतील. परंतु या आरक्षित जागांवर पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास रिक्त जागा संबंधित संवर्गाला देऊन गुणवत्तेनुसार रिक्त जागा भरण्यात येतील.

(०९) प्रवेश देताना प्रथमतः खुला संवर्ग (Open merit) अनुसार यादी तयार करण्यात येईल. मागासवर्गीयांची निवडही खुल्या प्रवर्गांतर्गत करण्यात येईल. खुल्या प्रवर्गात निवड झालेले मागासवर्गीय वगळून मागासवर्गीयांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. एखाद्या मागासवर्गीय घटकासाठी पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या जागा नियमानुसार व गुणवत्तेनुसार मागासवर्गीयांच्या इतर घटकांमधून भरण्यात येईल. त्यानंतरही राखीव संवर्गातून जागा शिल्लक राहिल्यास त्या सर्वसाधारण गटातून गुणवत्तेनुसार भरण्यात येईल.

(१०) मुलाखतीच्या वेळी उमेदवाराने खोटी, चुकीची माहिती भरलेली आढळल्यास त्याचा अर्ज बाद करण्यात येईल.

(११) अंतिम तारीख संपल्यानंतर जर अभ्यासकेंद्रावर २५ किंवा २५ पेक्षा कमी विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झालेले असतील तर सर्व पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल. अभ्यासकेंद्रावर २६ किंवा २६ पेक्षा जास्त अर्ज प्राप्त असतील तर आरक्षणानुसार प्रवेश देण्यात येईल. परंतू २५ पेक्षा अधिक विद्यार्थी भरले जाणार नाहीत.

## ३.७ शिक्षणक्रम शुल्क

एम.ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रम प्रवेश मुलाखतीच्या वेळी विद्यार्थ्याने विद्यापीठात रु. १८,३५०/– शुल्क भरावयाचे आहे. त्यात

| | |
|---|---|
| विद्यापीठ शुल्क | रु. ११,४७५/– |
| अभ्यासकेंद्र शुल्क (दोन्ही वर्षांचे मिळून) | रु. ६,८७५/– |
| **एकूण शिक्षणक्रम शुल्क** | **रु. १८,३५०/–** |

त्यांपैकी प्रवेशाच्या वेळी विद्यापीठ शुल्क रु.११,४७५/– चलनाद्वारे विद्यापीठाने निर्धारित केलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र, सेंट्रल बँक ऑफ इंडीया, बँक ऑफ इंडीया, युनियन बँक व पंजाब नॅशनल बँक ह्या बँकेमध्ये रोखीने भरावे व अभ्यासकेंद्र शुल्क ६,८७५/– अभ्यासकेंद्रावर जमा करावेत व पावती घ्यावी.

## ३.८ कालावधी

एम.ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रमाची किमान कालमर्यादा चोवीस महिन्यांची आहे. मूळ शुल्कामध्येच जास्तीत जास्त पाच वर्षे नोंदणी राहू शकेल. या कालावधीत विद्यार्थ्याला अंतिम परीक्षेसाठी १ + ८ संधी उपलब्ध होतील. पाच वर्षांनंतर नोंदणी आपोआप रद्द होईल. पाच वर्षांनंतर विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यार्थ्याला पुन्हा नोंदणी करता येईल. त्याची मुदत पाच वर्षांची असेल. **पुनर्नोंदणी शुल्क म्हणून (ज्या वर्षी नोंदणी कालावधी संपतो) त्या वर्षाच्या मुक्त विद्यापीठाच्या नियमित एम.ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रमासाठी असलेले शुल्क भरावे लागेल किंवा विद्यापीठाने निर्धारित केलेले शुल्क भरावे लागेल.**

## ३.९ माध्यम

या शिक्षणक्रमासाठी पुरविण्यात येणारे सर्व अध्ययन–साहित्य मराठी माध्यमातून असेल. मात्र उत्तरे लिहिण्यासाठी पूर्वपरवानगीने हिंदी वा इंग्रजी यांपैकी एका माध्यमाचा वापर करता येईल. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका मात्र मराठी व इंग्रजीतच उपलब्ध होतील. त्यातील मराठी प्रश्नपत्रिका कायद्यानुसार वैध मानण्यात येतील.

# ४. नोंदणी प्रक्रिया

(१) प्रवेश–अर्ज भरण्यापूर्वी पात्रता आणि अपात्रता अटी नीट वाचाव्यात. तुम्ही प्रवेश पात्रता अटी पूर्ण करत असाल तरच प्रवेश–अर्ज भरावा. अभ्यासकेंद्रास प्राप्त झालेले अर्ज पात्रता अटी पूर्ण करतात हे गुणवत्ता यादी तयार करताना गृहीत धरले जाते. संगणकामार्फत प्रवेश–अर्जातील माहितीची नोंद होते व त्याआधारे गुणवत्ता यादी तयार होते. कागदपत्रे वाचली जात नाहीत.

(२) निवड निकषांनुसार गुणवत्ता यादी तयार केली जाते व प्रवेश निश्चितीसाठी मुलाखतीस बोलावले जाते. कागदपत्रांची पडताळणी करताना पात्र/अपात्रतेची शहानिशा होते. **तुम्ही अपात्र असून प्रवेश-अर्ज भरला असेल किंवा चुकीची माहिती दिली असेल आणि कागदपत्राच्या पडताळणीनंतर तुम्हांला एखाद्या कारणास्तव प्रवेश नाकारला गेला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराचीच राहील.**

(३) **जात दाखला प्रमाणपत्र प्रवेश-अर्ज भरते वेळी असणे अत्यावश्यक आहे अन्यथा प्रवेशासाठी विचार केला जाणार नाही.**

(४) **प्रवेश प्रक्रिया अभ्यासकेंद्रावरच करण्यात येईल.**

### प्रवेश-अर्ज कसा भरावा

**अभ्यासकेंद्रावर अर्ज भरण्याविषयी मार्गदर्शन केले जाईल. परंतु ते पुरेसे असेलच असे नाही. भरलेला अर्ज अभ्यासकेंद्रावर स्वीकारते वेळीही विद्यापीठाच्या दृष्टीने काही महत्त्वाच्या बाबी तपासल्या जातील. परंतु उमेदवाराने अर्ज अचूक भरलेला आहे किंवा नाही हे तपासले जाईलच असे नाही. त्यामुळे तो प्रवेशअर्ज अचूक भरण्याची खात्री आपण स्वतःच करणे आवश्यक आहे. तेव्हा प्रवेश-अर्जात उमेदवाराची काही माहिती अपूर्ण किंवा चुकीची आढळल्यास त्याची पूर्णतः जबाबदारी उमेदवाराची असेल. त्यासाठी अभ्यासकेंद्रांना जबाबदार धरले जाणार नाही.**

(०१) एम.ए. (शिक्षणशास्त्र) प्रवेशासाठी चा अर्ज On-line अभ्यासकेंद्रावर/उपलब्ध असेल. त्यासाठी Download करून प्रवेश-अर्ज लक्षपूर्वक बारकाईने वाचणे गरजेचे आहे.

(०२) अर्जात तुम्हाला लागू न पडण्यासारखे मुद्दे असतील ते भरू नयेत. पण जे मुद्दे लागू आहेत ते भरणे आवश्यक आहे. तसेच या अर्जातील तारांकित मुद्दे भरणे अनिवार्य आहे.

(०३) प्रवेश-अर्जावरील अर्ज क्रमांक काळजीपूर्वक भरणे आवश्यक आहे.

(०४) प्रवेश अर्जाची प्रत अभ्यासकेंद्रावर जमा करून पोच घ्यावी.

(०५) प्रवेश अर्जात भरलेल्या माहितीच्या आधारे आणि आरक्षित जागांच्या आधारेच प्रथमदर्शनी प्रवेशाची निश्चिती केली जाईल.

(०६) प्रवेश अर्जासोबत कोणतेही सहपत्र व मूळपत्र जोडू नये. ते स्वीकारले जाणार नाही.

(०७) **अर्जदाराने गुणवत्ता यादीत प्रवेशासाठी निवड झाल्यास मुलाखतीच्या वेळी सोबत खालील कागदपत्रांच्या मूळ प्रती व छायांकित प्रती (फोटोकॉपी) आणावेत.**

७.१ उमेदवाराकडे असलेला पूर्णपणे भरलेला मूळ प्रवेश अर्जाची झेरॉक्स प्रत.

७.२ शैक्षणिक पात्रतेच्या गुणपत्रक व प्रमाणपत्रांच्या मूळ व साक्षांकित प्रती.

७.३ जन्मतारखेचा पुरावा दर्शविणारी कोणत्याही प्रमाणपत्राची मूळ व साक्षांकित प्रत.

७.४ नाव बदलले असल्यास पुरावा म्हणून राजपत्राची मूळ व साक्षांकित प्रत.

७.५ मागासवर्गीय उमेदवारांनी आपआपल्या प्रवर्गाची खालील प्रमाणपत्राच्या मूळ व साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. जे उमेदवार मागासवर्गीय असल्याचे प्रमाणपत्र सादर करू शकणार नाही त्या उमेदवारांचा खुला प्रवर्ग मानण्यात येईल.

७.५.१ अनुसूचित जाती (एस.सी.) - सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र.

७.५.२ अनुसूचित जमाती (एस.टी.) - सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र.

७.५.३ विमुक्त जाती (व्ही.जे.) - अ/भटक्या जमाती (एन.टी.) ब, क, ड/इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.)/विशेष मागासवर्गीय (एस.बी.सी.) - सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व **प्रवेश अर्ज ज्या नावाने भरलेले असेल त्या नावाचे वैध कालावधीचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non Creamylayer Certificate)**

(०८) सामाजिक आरक्षणातून प्रवेशाबाबत खालील प्रमाणपत्राच्या मूळ व साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. ज्या उमेदवारांनी सामाजिक आरक्षणाबाबतचे प्रमाणपत्र सादर करू शकणार नसेल तर अशा उमेदवारांना सामाजिक आरक्षणाचा लाभ मिळणार नाही.

**८.१ अपंग -** शारीरिक अपंग (PH), अल्पदृष्टी (VI), कर्णबधिर (HI) - किमान ४० टक्के अपंग असल्या-बाबतचे जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र.

**८.२ माजी सैनिक पाल्य (EX) -** मुलगा/अविवाहित मुलगी/मृत सैनिकाची पत्नी - जिल्हा सैनिक बोर्ड यांचे प्रमाणपत्र नातेसंबंधाचा पुरावा आवश्यक आहे. तसेच डिसचार्ज बुक आवश्यक आहे.

**८.३ आजी सैनिक पाल्य (MS) -** पत्नी/मुलगा/अविवाहित मुलगी - आजी सैनिक सेवेत असल्याचा दाखला, आजी सैनिकाच्या ओळखपत्राची प्रत, संबंधित पाल्याचा नातेसंबंध असल्याचा पुरावा.

**८.४ विधवा -** महानगरपालिका/नगरपालिका/ग्रामपंचायत यांनी दिलेले पतीचे मृत्यू प्रमाणपत्र.

**८.५ घटस्फोटिता -** विवाहनोंदणी दाखला किंवा न्यायालयाचे घटस्फोटाबाबतचे आदेश किंवा मुस्लीम महिलांच्या बाबतीत नियमाप्रमाणे निकाह लावणारे काझी यांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र असे प्रमाणपत्र नोटरीकडून मराठी/हिंदी/इंग्रजी भाषेत रूपांतरित करून कागदपत्रे आणणे.

८.६ **आपत्तीग्रस्त/प्रकल्पग्रस्त** – जिल्हा पुनर्वसन अधिकारी/सक्षम अधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र, परंतु त्या प्रमाणपत्रात उमेदवाराचे नाव असणे आवश्यक आहे.

(०९) गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी निवड झालेल्या उमेदवारांस **मुलाखती-साठी तुम्ही प्रवेशअर्ज भरलेल्या अभ्यास केंद्रावर बोलविण्यात येईल.**

(१०) **मुलाखतीसाठी निवड केलेले उमेदवार उपस्थित न राहिल्यास किंवा त्यांच्या कागदपत्रातील तफावतींमुळे जागा रिक्त राहिल्यास त्या भरण्याची व्यवस्था असावी म्हणून प्रतीक्षा यादीतील काही उमेदवारांना त्यावेळेसच मुलाखतीस बोलविण्यात येईल. मात्र त्यांचा विचार रिक्त जागा असल्यासच होईल. प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना मुलाखतीस बोलविले म्हणजे प्रवेश मिळेलच असे नाही.**

(११) मुलाखतीस येताना शिक्षणक्रम शुल्क रु. ११,४७५/- विद्यापीठाने निर्धारित केलेल्या बँकेतच चलनाद्वारे प्रवेश निश्चित झाल्यानंतर भरावयाचे आहे व अभ्यासकेंद्र शुल्क रुपये ६८७५/- रोखीने अभ्यासकेंद्रावर जमा करावेत व पावती घ्यावी.

(१२) प्रवेशासाठी गुणवत्ता यादीत आलेल्या उमेदवारांना अभ्यासकेंद्राकडून मुलाखतपत्र/एस.एम.एस./मोबाईलद्वारे संपर्क साधण्यात येईल. तरीदेखील उमेदवारांनी अभ्यासकेंद्राशी सतत संपर्क साधून माहिती घ्यावी.

(१३) ज्या तुकडीसाठी प्रवेश-अर्ज सादर केला असेल त्या तुकडीच्या प्रवेशासाठीच फक्त तो अर्ज वैध धरला जाईल.

(१४) प्रवेश समितीच्या शिफारसीनंतर विद्यार्थ्याने एकत्रित शिक्षणक्रम शुल्क रु. १८,३५०/- भरल्यानंतरच अंतिम प्रवेश निश्चित करण्यात येईल.

**तुम्ही शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी भरलेल्या मूळ अर्जाची फोटो कॉपी प्रत तुमच्याकडे ठेवणे आवश्यक आहे.**

### शिक्षणक्रमाची संरचना/आकृतिबंध

या शिक्षणक्रमाचे (१) अनिवार्य अभ्यासक्रम, (२) वैकल्पिक अभ्यासक्रम व (३) संशोधन कार्य असे तीन भाग पडतात.

| *क्र.* | *अभ्यासक्रमाचे नाव* | *संकेतांक* |
|---|---|---|
| | **प्रथम वर्षासाठी (अनिवार्य विषय)** | |
| १. | शिक्षणाचे तात्त्विक, सामाजिक व सांस्कृतिक यथार्थदर्शन | EDU-501 |
| २. | शिक्षणाचे मानसशास्त्रीय यथार्थदर्शन | EDU-502 |
| ३. | अनुदेशन प्रणाली अभिकल्प | EDU-503 |
| ४. | संशोधन पद्धती व सांख्यिकी तंत्राचे उपयोजन | EDU-504 |
| | **द्वितीय वर्षासाठी (अनिवार्य विषय)** | |
| १. | मूल्यनिर्धारण व मूल्यमापन | EDU-511 |
| २. | शिक्षणातील संज्ञापन मार्ग | EDU-512 |
| | **वैकल्पिक अभ्यासक्रम (१)** | |
| १. | शैक्षणिक व्यवस्थापन व नियोजन | EDU-513 |
| २. | शैक्षणिक नियोजन | EDU-514 |
| | *किंवा* | |
| | **वैकल्पिक अभ्यासक्रम (२)** | |
| १. | प्रौढ व निरंतर शिक्षणाचे अधिष्ठान | EDU-515 |
| २. | अनौपचारिक शिक्षण | EDU-516 |

## ५. मूल्यमापन प्रक्रिया

(१) विद्यार्थ्यांचे मूल्यमापन दोन प्रकारे करण्यात येईल.
(अ) अंतर्गत (निरंतर) मूल्यमापन
(आ) अंतिम परीक्षा –
(१) लेखी परीक्षा, लघू शोधप्रबंध
(२) मौखिक परीक्षा

अंतर्गत मूल्यमापनात दीर्घ स्वाध्याय, लघू स्वाध्याय असतील. प्रत्येक विद्यार्थ्याला अनिवार्य अभ्यासक्रमावर आधारित प्रत्येकी एक याप्रमाणे सखोल अभ्यास करून एकूण तीन दीर्घ स्वाध्याय सादर करावे लागतील. संशोधन पद्धती आणि संशोधनासाठी संख्याशास्त्र ह्या अनिवार्य अभ्यासक्रमासाठी दीर्घ स्वाध्याय हा विद्यार्थ्यांचा संशोधन आराखडा सादरीकरण असेल. प्रत्येक दीर्घ स्वाध्याय ४० गुणांचा असेल. दीर्घ स्वाध्यायाचे मूल्यमापन परिसंवाद/कृतिसत्रात दोन संमंत्रकांकडून केले जाईल.

प्रत्येक विद्यार्थ्याला वैकल्पिक अभ्यासक्रमांसाठी लघू स्वाध्याय पूर्ण करावयाचे आहेत. **प्रत्येक वैकल्पिक अभ्यासक्रमासाठी दोन असे एकूण चार स्वाध्याय पूर्ण करावे लागतील.**

**प्रत्येक लघू स्वाध्यायाला २० गुण असतील.** लघू स्वाध्यायाचे मूल्यमापन विषय संमंत्रक करतील व लेखनाबाबत प्रत्याभरण देतील. **दीर्घ स्वाध्याय व लघू स्वाध्याय पूर्ण करणे अनिवार्य आहे.**

प्रत्येक वैकल्पिक विषय यासाठी २ स्वाध्याय असतील, प्रत्येकी २० गुणांप्रमाणे एकूण गुण ४० असतील.

अंतिम परीक्षा दोन प्रकारची असेल.

**लेखी परीक्षा** : प्रत्येक सैद्धांतिक अभ्यासक्रमाची लेखी परीक्षा ही वर्षातून दोनदा घेतली जाईल. प्रथम वर्षाची ४ अभ्यासक्रमांची परीक्षा प्रत्येकी १०० गुण याप्रमाणे ४०० गुणांची असेल. दुसऱ्या वर्षाची परीक्षा दुसऱ्या वर्षाच्या शेवटी होईल. तीही ४ विषयांची ४०० गुणांची होईल.

**परीक्षा दरवर्षी मे व ऑक्टोबरमध्ये होईल. या शिक्षणक्रमाची वर्षातून दोनदा परीक्षा होईल. परीक्षा अर्ज परीक्षेपूर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होतील.**

लघू शोधप्रबंध अंतिम परीक्षा – अभ्यासकेंद्रावर लघू शोधप्रबंध जमा करण्याची संधी वर्षातून दोनदा असते. (एप्रिलमध्ये आणि सप्टेंबरमध्ये). लघुप्रबंध अहवालाचे मूल्यमापन व मौखिक परीक्षा असे या परीक्षेचे स्वरूप असते. ही परीक्षा वर्षातून दोनदा घेतली जाते.

अंतिम परीक्षेची गुण विभागणी खालीलप्रमाणे असते.

(२) प्रत्येक सैद्धान्तिक अभ्यासक्रमाची अंतिम लेखी परीक्षा एकूण १०० गुणांची राहील. विद्यार्थ्याला काही निबंधवजा व काही लघूत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहावी लागतील. निबंधवजा प्रश्नाला प्रत्येकी २० गुण व लघूत्तरी प्रश्नांना प्रत्येकी १० गुण राहतील. सर्व सैद्धान्तिक अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका मराठीत आणि इंग्रजीत राहतील. एम. ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रमाचे माध्यम मराठी असल्याने ज्यांना उत्तरे अथवा लघू शोधप्रबंध इंग्रजीतून किंवा हिन्दीतून लिहावयाचे असतील त्यांना तशी पूर्वपरवानगी घ्यावी लागेल.

(३) उत्तरपत्रिकांची तपासणी केंद्रीय पद्धतीने संबंधित अभ्यासक्रमांच्या तज्ज्ञ प्राध्यापकांच्या साहाय्याने केली जाईल.

(४) लघू शोधप्रबंधाचे परीक्षण दोन परीक्षक करतील (एक बहिःस्थ परीक्षक व एक अंतर्गत परीक्षक). लेखी अहवाल मूल्यमापना–व्यतिरिक्त मौखिक परीक्षाही असेल.

(५) शिक्षणक्रमाचे मूल्यमापन

(अ) सैद्धान्तिक अभ्यासक्रम : ८०० गुण
(८०% अंतिम परीक्षा + २०% अंतर्गत मूल्यमापन)
**लघुस्वाध्याय २० + २० असे ४० गुणांचे होतील.**

(आ) लघू शोधप्रबंध, मूल्यमापन व मौखिक परीक्षा१०० गुण
एम. ए. (शिक्षणशास्त्र) या शिक्षणक्रमाची मूल्यमापन प्रक्रिया ही मुक्त विद्यापीठाच्या एम. एड. शिक्षणक्रमाशी सुसंगत असेल.

विद्यार्थ्यांचे मूल्यमापन दोन प्रकारे केले जाईल.

**(अ) अंतर्गत मूल्यमापन**

(१) अनिवार्य अभ्यासक्रम ३ – दीर्घ स्वाध्याय (फक्त लेखी)
(२) संशोधन पद्धती १ दीर्घ स्वाध्याय – संशोधन आराखडा (सादरीकरण)
(३) वैकल्पिक अभ्यासक्रम ४ लघुस्वाध्याय

**(आ) अंतिम परीक्षा (८०% भारांश)**

(१) लेखी परीक्षा*
(२) लघू शोध प्रबंध**
(३) मौखिक परीक्षा

* अंतिम लेखी परीक्षा दोन वेळेला असेल प्रथम वर्षाची ४ अभ्यासक्रमाची अंतिम परीक्षा प्रथम वर्षाच्या शेवटी व द्वितीय वर्षी ४ अभ्यासक्रमांची द्वितीय वर्षाच्या शेवटी अंतिम परीक्षा घेण्यात येईल.

** अभ्यासकेंद्रावर लघुशोध प्रबंध जमा करण्याची संधी वर्षातून दोनदा दिली जाते. मार्च अखेर तसेच सप्टेंबर अखेर पर्यंत अहवालाचे मूल्यमापन व त्यानंतर मौखिक परीक्षा आयोजित केली जाईल.

### उत्तीर्णतेचे नियम

(१) प्रत्येक अभ्यासक्रमाच्या अंतिम लेखी परीक्षा व स्वाध्याय यामध्ये प्रत्येकी किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य आहे.

(२) लघू शोधप्रबंध उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५०% गुण मिळविणे अनिवार्य आहे. तसेच मौखिक परीक्षेत ५०% गुण मिळविणे अनिवार्य आहे.

(३) संपूर्ण शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी किमान ५०% गुण मिळविणे अनिवार्य आहे.

**परिशीलन समिती (Revaluation Committee)** : सर्व एम.ए. शिक्षणशास्त्र अभ्यासकेंद्रांवर संशोधन अहवाल मूल्यमापन व मौखिक परीक्षा झाल्यानंतर सर्व अहवालांचे विद्यापीठात एकत्रितरित्या परिशीलन समितीकडून परिशीलन केले जाते. त्यानंतर विद्यार्थ्यांचा अंतिम निकाल जाहीर केला जाईल. परिशीलन समितीची बैठक ही वर्षातून दोनदाच आयोजित केली जाते.

मूल्यमापनाबाबतची सविस्तर माहिती तुम्हाला अभ्यासकेंद्रावर मिळेल.

### अंतिम परीक्षेसाठी पात्रतेच्या अटी

(१) शिक्षणक्रमाच्या सर्व संपर्कसत्रांना उपस्थित राहून सर्व प्रात्यक्षिक कार्ये– दीर्घ स्वाध्याय – लघू स्वाध्याय पूर्ण केल्याबद्दलचे अभ्यासकेंद्र–प्रमुखांचे प्रमाणपत्र विद्यार्थ्याने घेतले पाहिजे.

(२) प्रथम संपर्कसत्रास अनुपस्थित राहिल्यास संपर्कसत्राच्या प्रत्येक दिवसाच्या अनुपस्थितीचा रु. २००/– प्रमाणे अतिरिक्त शुल्क भरल्याशिवाय व ते सत्र पूर्ण केल्याशिवाय अंतिम परीक्षेस बसता येणार नाही. प्रत्येक दिवसाच्या रु. २००/– रकमेनुसार, एकुण शुल्कापैकी विद्यापीठ शुल्क चलन स्वरूपात विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या बँकेत भरावे व त्या चलनाची प्रत व अर्ज विद्यापीठातील संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांच्याकडे अनुपस्थितीचे कारण नमूद करून अर्ज करावा. (अभ्यासकेंद्र शुल्क ४०% व विद्यापीठ शुल्क ६०% विभागणी केलेली आहे.)

(३) सर्व संपर्कसत्रांत मिळून ८०% उपस्थिती अनिवार्य आहे.

### श्रेयांक संक्रमण

मुक्त विद्यापीठाच्या एम.ए. (शिक्षणशास्त्र) आणि विषय संप्रेषण, शैक्षणिक संप्रेषण, दूरशिक्षण या क्षेत्रातील पदव्युत्तर आणि एम.फिल. शिक्षणक्रमात पुढील अभ्यासक्रम समान आहेत.

(१) अनुदेशन प्रणाली अभिकल्प
(२) शिक्षणातील संज्ञापन मार्ग
(३) मूल्यमापन व मूल्यनिर्धारण

विद्यार्थ्याने एका शिक्षणक्रमातील वरील एक ते तीन विषयांचे अंतर्गत कार्य आणि अंतिम परीक्षा उत्तीर्ण केलेली असल्यास अभ्यासक्रम समान असेपर्यंत श्रेयांक संक्रमण मिळेल. परंतु श्रेयांक संक्रमण घेणे बंधनकारक नाही. पदव्युत्तर शिक्षणक्रमाकडून एम.ए. (शिक्षणशास्त्र) शिक्षणक्रमास श्रेयांक संक्रमणासाठी विद्यापीठ नियमानुसार जादा कार्य करावे लागेल. एम.फिल. कडून मागणी केल्यास त्याला जादा कार्य करावे लागत नाही.

(१) ज्या विद्यार्थ्यांना श्रेयांक संक्रमण हवे असेल त्यांनी प्रवेश घेतेवेळी श्रेयांक संक्रमण अर्जाची मागणी करून श्रेयांक संक्रमणाचा स्वतंत्र अर्ज भरून द्यावा. त्यानंतर श्रेयांक संक्रमणाचा लाभ घेता येणार नाही.

(२) श्रेयांक संक्रमणाची मागणी करतानाच विद्यार्थ्यांना प्रती अभ्यासक्रम रु. ५००/– प्रक्रिया शुल्क भरावे लागेल.

(३) अर्जासोबत ज्या विषयांची श्रेयांक संक्रमणाची मागणी केली आहे त्या अभ्यासक्रमात उत्तीर्ण असल्याची झेरॉक्स गुणपत्रिका लावणे अत्यावश्यक आहे.

(४) श्रेयांक संक्रमणाबाबतचा निर्णय त्यासाठी नेमलेली उपसमिती घेईल. उपसमितीने निर्णय दिल्यानंतर श्रेयांक संक्रमण मिळाले आहे किंवा नाही याचा निर्णय विद्यार्थ्यास कळविला जाईल.

(५) श्रेयांक संक्रमण किमान दोन अभ्यासक्रमाचे घेता येते.

(६) श्रेयांक संक्रमणासाठी अतिरिक्त स्वाध्यायाचे कार्य करावे लागते. प्रत्येक अनिवार्य अभ्यासक्रमासाठी एक व वैकल्पिक अभ्यासक्रमासाठी एकूण २ अतिरिक्त स्वाध्याय अभ्यासकेंद्रांवर जमा करावे.

(७) त्यानंतर अभ्यासकेंद्राकडून प्रत्येक अनिवार्य अभ्यासक्रमाचे एकूण ४० गुणापैकी व वैकल्पीक अभ्यासक्रमाचे एकूण दोन स्वाध्यायाचे २०–२० गुणांपैकी स्वाध्याय क्र.१ =? व स्वाध्याय क्र.२ =? गुण अभ्यासकेंद्राच्या लेटरपॅडवर सही शिक्यासह व गुणपत्रकासह शिक्षणशास्त्र विद्याशाखेकडे पाठविणे आवश्यक आहे. त्याशिवाय श्रेयांक संक्रमणाची कार्यवाही केली जाणार नाही. सोबत मागील शिक्षणक्रम उत्तीर्णतेच्या गुणपत्रकाची सत्यप्रत पाठवावी.

**श्रेणी सुधारणा**

ज्या विद्यार्थ्याने एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाला प्रवेश घेतलेला आहे व परीक्षेचा निकाल जाहीर झालेला आहे. परंतु ज्या विद्यार्थ्यांना + (५५%) गुणांपेक्षा कमी गुण प्राप्त झालेले असतील व अशा विद्यार्थ्यांना श्रेणी सुधारणा करावयाची असल्यास त्याबाबत खालील बाबी आवश्यक आहे.

(१) अंतिम निकाल जाहीर झाल्यानंतर लगेचच एक महिन्याच्या आत त्याबाबतचा अर्ज उपकुलसचिव, परीक्षा – कक्ष–१ ला पाठवावे. त्याशिवाय श्रेणीसुधारणा करता येणार नाही.

(२) एकदा पदवी प्रमाणपत्र तयार झाल्यानंतर कुठल्याही परीस्थितीत श्रेणी सुधारणा करता येणार नाही.

(३) श्रेणी सुधारणा करण्यासाठी एकूण १५०० रु. शुल्क आकारले जाईल व प्रति अभ्यासक्रम परीक्षा शूल्क त्या त्या वेळी असणारे वेगळे आकारले जाईल.

# ६. विभागीय केंद्रे

| *क्र.* | *विभाग* | *संपर्कासाठी पत्ता* | *दूरध्वनी* |
|---|---|---|---|
| १. | **अमरावती** | विभागीय संचालक<br>मुक्त विद्यापीठाचे<br>अमरावती विभागीय केंद्र<br>व्ही. एम. व्ही.<br>ते वलगाव रोड,<br>पोस्ट व्ही. एम. व्ही.<br>अमरावती ४४४ ६०४ | (०७२१)<br>कार्या : २५३१४४५<br>फॅक्स : २५३१४४४ |
| २. | **औरंगाबाद** | विभागीय संचालक<br>मुक्त विद्यापीठाचे<br>औरंगाबाद विभागीय केंद्र,<br>द्वारा : सर्व्हे नं. ४१, सैनिकी<br>मुलांच्या वसतिगृहाच्या पूर्वेस<br>नंदनवन कॉलनी, छावणी<br>औरंगाबाद ४३१ ००२ | (०२४०)<br>कार्या : २३७१०६६<br>फॅक्स : २३७१०८८ |
| ३. | **मुंबई** | विभागीय संचालक<br>मुक्त विद्यापीठाचे<br>मुंबई विभागीय केंद्र<br>द्वारा : जगन्नाथ शंकरशेठ<br>म.न.पा.ची मराठी प्राथमिक शाळा<br>दुसरा मजला<br>फ्रेअर ब्रीज (साऊथ)<br>नाना चौक, ग्रँट रोड (प.)<br>मुंबई - ४०० ००७ | (०२२)<br>कार्या : २३८७४१८६<br>फॅक्स : २३८१३२५६ |
| ४. | **नागपूर** | विभागीय संचालक<br>मुक्त विद्यापीठाचे<br>नागपूर विभागीय केंद्र<br>रावबहादूर डी.<br>लक्ष्मीनारायण बंगला, विद्यापीठ<br>क्रीडा परिसर, लॉ कॉलेज कॅम्पस<br>रविनगर चौक<br>नागपूर - ४४० ००१ | (०७१२)<br>कार्या : २५५३७२४<br>फॅक्स : २५५३७२५ |
| ५. | **नाशिक** | विभागीय संचालक<br>मुक्त विद्यापीठाचे<br>नाशिक विभागीय केंद्र,<br>महानगरपालिकेची जुनी इमारत<br>दुसरा मजला, नवीन पंडित कॉलनी<br>नाशिक ४२२ ००२ | (०२५३)<br>कार्या : २३१७०६३<br>फॅक्स : २५७६७५६ |
| ६. | **पुणे** | विभागीय संचालक<br>मुक्त विद्यापीठाचे<br>पुणे विभागीय केंद्र<br>शाहीर अण्णाभाऊ साठे<br>प्रशालागृह, महानगरपालिकेची<br>शाळा क्र. ५ (मुलांची)<br>६५४, सदाशिव पेठ हौदासमोर<br>कुमठेकर मार्ग<br>पुणे ४११ ०३० | (०२०)<br>कार्या : २४४९११०७<br>फॅक्स : २४४५७९१४ |
| ७. | **कोल्हापूर** | विभागीय संचालक<br>मुक्त विद्यापीठाचे<br>कोल्हापूर विभागीय केंद्र<br>शिवाजी विद्यापीठ परिसर<br>पोस्ट ऑफिसजवळ, विद्यानगर<br>कोल्हापूर ४१६ ००४ | (०२३१)<br>कार्या : २६०७०२२<br>फॅक्स : २६०७०२३ |
| ८. | **नांदेड** | विभागीय संचालक<br>मुक्त विद्यापीठाचे<br>नांदेड विभागीय केंद्र<br>द्वारा : स्वामी रामानंद तीर्थ<br>मराठवाडा विद्यापीठ<br>क्रीडा इमारत,<br>नांदेड ४२१ ६०६ | (०२४६२)<br>कार्या : २३६७१८<br>फॅक्स : २३६७१८ |
| ९. | **कल्याण** | कै. खासदार प्रकाश परांजपे<br>स्पर्धात्मक परीक्षा केंद्र<br>कल्याण डोंबीवली<br>महानगरपालिकेची इमारत<br>चंद्रभूषण प्लाझा<br>मिश्रा कंपाऊंड, सहजानंद चौक<br>कल्याण (प.)-४२१३०१ | |
| १०. | **सोलापूर** | विभागीय संचालक,<br>मुक्त विद्यापीठाचे सोलापूर<br>विभागीय केंद्र द्वारा दयानंद<br>महाविद्यालय<br>सोलापूर - ४१३००२ | (००१७)<br>२३७५५११<br>२३७५५२२<br>९४२२२९२६७२ |

# ७. अभ्यासकेंद्रे

| अ. क्र. | जिल्हा (District) | अभ्यासकेंद्र संकेतांक | अभ्यासकेंद्राचे नाव व पत्ता (Study Centre Name & Address) | दूरध्वनी क्रमांक (Telephone No.) |
|---|---|---|---|---|
| ■ | **अमरावती** | | | |
| १. | यवतमाळ | १४१०A | गुणवंतराव देशमुख शिक्षण महाविद्यालय, पुसद<br>जि. यवतमाळ (०७२३२) ०२२४३४२ | (०७२३३) २४६६६५०<br>मो. ९४२३५४१२२१ |
| २. | अमरावती | १२१२८ | रामकृष्ण शिक्षणशास्त्र महाविद्यालय, दारापूर,<br>जि. अमरावती – ४४४८१४ | (०७२२४) २४०५३९<br>मो.९८८१२९००११<br>/८८८१२२५७६१ |
| ३. | वाशिम | १५२२A | श्री बालाजी अध्यापक महाविद्यालय<br>गट क्र.१६२, जांभरूण<br>(पराडे) अकोला रोड, वाशिम, ता.जि. वाशिम | (०७५२) २३५९५९<br>मो.९०९६६९६७०८<br>मो.९२०९८०१८८७<br>मो.९८८१३६१४६९ |
| ४. | बुलढाणा | १३०२A | शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलढाणा – ४४३ ००१ | (०७२६२) २४७०६२<br>९४२२८६७४२९ |
| ५. | अकोला | ११७२A | कृष्णाजी जोशी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, केशवनगर<br>अकोला | (०७२४) २४८९९६४/६३<br>मो. ९९६०८८२६२३ |
| ■ | **नांदेड** | | | |
| १. | लातूर | ८४३४A | अभिनव अध्यापक महाविद्यालय<br>एम.आय.डी.सी. प्लॉट क्र. पी–४३, बार्शी रोड, लातूर | (०२३८२) २२१८२५,<br>२३९०७७१, ९४२२४६९५८६ |
| २. | परभणी | ८७५७A | भैरवनाथ निसर्ग मंडळाचे अध्यापक महाविद्यालय<br>बसमत रोड, परभणी | (०२४५२) २२७५६८,<br>फॅक्स – २२७५६८<br>९४०३००३६५२ |
| ३. | नांदेड | ८५८१A | सहयोग सेवाभावी संस्थेचे अध्यापक महाविद्यालय, विष्णुपुरी,<br>नांदेड – ४३१ ६०६ | (०२४६२) २२९१८३<br>९४२२१७१६३९ |
| ■ | **कोल्हापूर** | | | |
| १. | कोल्हापूर | ७११७४ | वाय.डी. माने शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सांगावा रोड, अलका शेतीफार्म जवळ,<br>क़ागल, जि. कोल्हापूर – ४१६२१६ | (०२३२५) २४५३२४ |
